आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
९ मे २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- पश्चिम बंगालमधे पहिल्या भाजप सरकारच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी संपन्न/ राज्याचे नववे मुख्यमंत्री म्हणून शुभेंदु अधिकारी यांनी घेतली शपथ

- देशाचे नवे सीडीएस म्हणून निवृत्त लेफ्टनंट जनरल एन एस राजा सुब्रमणी यांची तर नवे नौदलप्रमुख म्हणून व्हाईस ॲडमिरल कृष्ण स्वामिनाथन यांची नियुक्ती

- त्रिनिदाद आणि टोबॅगो बरोबरचे भारताचे घनिष्ठ संबंध आणि मैत्रीपूर्ण सहकार्य प्रशंसनीय असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्र्याचं प्रतिपादन

**आणि**

- रशिया आणि युक्रेन यांच्यात तीन दिवसांचा युद्धविराम

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधे भाजपचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शुभेंदु अधिकारी यांनी आज शपथ घेतली. कोलकात्यातल्या ब्रिगेड परेड मैदानात एका भव्य समारंभात राज्यपाल आर.एन. रवी यांनी अधिकारी यांना राज्याचे नववे मुख्यमंत्री म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. मुख्यमंत्र्यांसह दिलीप घोष, अग्निमित्रा पॉल, अशोक किर्तनिया, निशित प्रामाणिक आणि खुदिराम तुडू या पाच कॅबिनेट मंत्र्यांनी देखील या वेळी शपथ घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, अमित शहा,नितीन गडकरी हे आणि इतर केंद्रीय मंत्री तसंच भाजप-एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री या कार्यक्रमाला हजर होते. भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे सहकारी आणि पश्चिम बंगालमधले भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते माखनलाल सरकार या शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी पोहोचण्याआधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रोड शो केला.

भाजपनं पश्चिम बंगाल विधानसभेच्या २९४ जागांपैकी २०७ जागांवर विजय मिळवत सत्ता स्थापन केली आहे.

**<><><><><>**

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या १६५ व्या जयंतीनिमित्त उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंग  यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. टागोर यांचं कार्य साहित्यक्षेत्रापुरतं मर्यादित नसून त्यांच्या कार्यातून भारतीय संस्कृतीचं वैभव आणि मानवतेच्या जागतिक मूल्यांचं प्रतिबिंब दिसून येतं, असं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे. तर रवींद्रनाथ टागोर यांनी भारताची शाश्वत मूल्य आणि  संस्कृतीचा आविष्कार आपल्या साहित्यातून केला असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या भावनेला प्रचंड बळ दिलं . त्यांचं जीवन, तत्त्वज्ञान आणि मूल्यं येणाऱ्या पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहतील, असं राजनाथ सिंग यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. टागोर यांनी साहित्य, संगीत आणि तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून स्वातंत्र्याच्या भावनेला नवी गती दिली, असं  केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. टागोर यांच्या जयंतीनिमित्त नवी दिल्लीत संविधान सदन इथल्या त्यांच्या प्रतिमेला खासदार, माजी सदस्य आणि लोकसभा महासचिव उत्पल कुमार सिंग यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून दोन दिवस गुजरातच्या दौऱ्यावर जाणार आहेत. सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाला ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित सोहळ्यात ते सहभागी होणार आहेत. मंदिरातला कुंभाभिषेक आणि ध्वजारोहण सोहळा त्यांच्या हस्ते होणार असून ते विशेष पूजाही करतील.

प्रधानमंत्री नंतर वडोदरा इथं सरदारधाम वसतीगृहाचं उद्घाटन करतील.

<><><><><>

निवृत्त लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांची देशाचे पुढील सीडीएस अर्थात संरक्षण दल प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सध्याचे सीडीएस, जनरल अनिल चौहान यांचा कार्यकाळ ३० मे रोजी संपत आहे. याच दिवशी जनरल एन. एस. राजा सुब्रमणी, पदभार स्वीकारतील घेतील आणि संरक्षण मंत्रालयाच्या लष्करी व्यवहार विभागाचे सचिव म्हणूनही काम पाहतील. लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी १ सप्टेंबर २०२५ पासून राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयात लष्करी सल्लागार आहेत.

व्हाईस ॲडमिरल कृष्ण स्वामिनाथन् यांची नौदलाचे पुढील प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते सध्या पश्चिम नौदल कमांडचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ म्हणून कार्यरत आहेत. त्यांना नौदलात कार्यान्वयन, सामरिक आणि कर्मचारी व्यवस्थापन पदांवर जवळपास चार दशकांचा अनुभव आहे. सध्याचे नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी येत्या ३१ मे रोजी सेवानिवृत्त होणार आहेत.

**<><><><><>**

नागरिकांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या हेतूनं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरु केलेल्या योजनांमुळे समाजातल्या वंचित आणि दुर्लक्षित घटकांना विमा सुरक्षा मिळू लागली आहे, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना आणि अटल पेन्शन योजनेला ११ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात त्या काल बोलत होत्या. या योजनांच्या माध्यमातून नागरिकांना जीवनातल्या अस्थिरतेविरुद्ध लढण्याचं सामर्थ्य प्राप्त होऊन दीर्घमुदतीसाठी आर्थिक सहाय्य मिळत आहे, या योजनांमध्ये नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर नोंदणी केली असून कोट्यवधी रुपयांच्या दाव्यांचा निपटारा करण्यात आला आहे, असं सीतारामन यांनी सांगितलं. डिजिटल स्वरुप, नोंदणी आणि दाव्यांची सुलभ प्रक्रिया हे या योजनांचं बलस्थान असल्याचं केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

त्रिनिदाद आणि टोबॅगो बरोबर असलेले भारताचे घनिष्ठ संबंध आणि मैत्रीपूर्ण सहकार्य प्रशंसनीय असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर यांनी म्हटलं आहे.

**---होल्ड - बाईट ---**

जयशंकर सध्या या देशाच्या दौऱ्यावर असून त्यांनी आज त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या प्रधानमंत्री कमला प्रसाद-बिसेसर यांची भेट घेतली आणि द्विपक्षीय सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी नवीन कल्पना आणि उपक्रमांवर चर्चा केली. या भेटीदरम्यान दोन्ही देशांमध्ये पर्यटन, परराष्ट्र व्यवहार या क्षेत्रांसह पोर्ट ऑफ स्पेनमधल्या परराष्ट्र आणि कॅरिकॉम व्यवहार मंत्रालयाच्या इमारतीला सौरऊर्जेवर चालवण्यासाठी एका करारावर स्वाक्षरी करण्यात आली. याशिवाय त्रिनिदाद आणि टोबॅगोमध्ये अनेक कल्याणकारी प्रकल्प आणि आयुर्वेद संस्था स्थापन करण्यासंबंधी देखील अनेक करार करण्यात आले.

<><><><><>

रशिया आणि युक्रेन यांच्यात तीन दिवसांच्या युद्धविराम झाला असल्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. हा तात्पुरता युद्धविराम रशियाच्या 'विजय दिना'च्या पार्श्वभूमीवर करण्यात येत असल्याचं त्यांनी आपल्या 'ट्रुथ सोशल' या समाज माध्यमावर म्हटलं आहे. हा विराम आजपासून येत्या सोमवारपर्यंत लागू राहील. विराम काळात दोन्ही बाजू परस्परांच्या प्रत्येकी एक हजार युद्धकैद्यांची मुक्तता करतील. हे युद्ध कायमस्वरूपी संपुष्टात आणण्याच्या उद्देशाने सध्या चर्चा सुरू असल्याचंही ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत अमेरिकेच्या पाठिंब्यानं मांडण्यात आलेल्या ठरावाचा मसुदा सदोष आणि राजकीय हेतूंनी प्रेरित असल्याचं म्हणत इराणनं तो नाकारला आहे. त्यामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीवरून या दोन देशांदरम्यानचा तणाव आणखी वाढला आहे. या प्रस्तावामुळे संघर्ष संपवण्यास या प्रस्तावाची मदत होण्याऐवजी बेकायदा कृत्यांना वैधता मिळेल असा दावा इराणनं केला आहे. इराणच्या बंदरालगतच्या भागात अमेरिकेनं केलेली नाकेबंदी उठवून होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जहाजांची वाहतूक पूर्ववत करणं हा युद्ध संपवून स्थिरतेच्या दिशेनं जाण्याचा एकमेव मार्ग असल्याचं इराणनं म्हटलं आहे. या प्रस्तावाला अमेरिकेसह बहारिन, सौदी अरेबिया, युएई, कुवेत आणि कतारचा पाठिंबा होता. जगातील सर्वात महत्त्वाच्या सागरी मार्गानं वाहतुकीचं स्वातंत्र्य असावं अशी मागणी करणारा हा ठराव होता.

<><><><><>

होर्मूझच्या सामुद्रधुनीजवळ काल एका लाकडी नौकेला आग लागून झालेल्या दुर्घटनेत एका भारतीय खलाशाचा मृत्यू झाला तर इतर चार जण जखमी झाले. त्या भागातून त्याचवेळी जाणाऱ्या जहाजातल्या कर्मचाऱ्यांनी या दुर्घटनाग्रस्त नौकेवरचे कर्मचारी आणि इतर प्रवाशांची सुटका केली. जखमींना दुबईच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. भारतीय दूतावासातल्या अधिकाऱ्यांनी काल या खलाशाची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली.

<><><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना होणार आहे. जयपूर मधल्या सवाई मानसिंग स्टेडिअमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

दरम्यान स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सनं दिल्ली कॅपीटल्सवर ८ गडी तसंच ३४ चेंडू राखून विजय मिळवला. कोलकाताचा हा सलग चौथा विजय तर दिल्लीचा सलग पाचवा पराभव ठरला.

या सामन्यात कोलकातानं नाणेफेक जिंकून पहिली गोलंदाजी करायचा निर्णय घेतल्यावर दिल्लीला निर्धारीत २० षटकांत ८ बाद १४२ धावांतच रोखलं. अर्धशतकी खेळी केलेल्या पथुम निसांका शिवाय दिल्लीच्या एकाही खेळाडूला मोठी खेळी करता आली नाही. त्यानं आयपीएल स्पर्धेतला आपला हजार धावांचा टप्पाही काल पार केला.

त्यानंतर कोलकातानं फीन अॅलन याच्या धडाकेबाज शतकी खेळीच्या जोरावर केवळ १४ षटकं आणि २ चेंडूतच विजयी लक्ष गाठलं. फीन अॅलननं षटकार मारून स्वतःचं शतक आणि संघाचा विजय नोंदवला.

फिन अॅलन हा टी ट्वेंटी क्रिकेटमध्ये एका कॅलेंडर वर्षात तीन शतकं झळकावणारा न्यूझीलंडचा पहिला फलंदाज ठरला आहे.

//<><><><><>//